शासनाचे अनुदानाबाबत चे सद्याचे धोरण विचारात घेता २०१७-१८ मध्ये मा. शासनाकडून मुद्रांक शुल्क १ % अधिभारातून र.रू. १० कोटी अनुदान अपेक्षित आहे. तथापि सदरचे उत्पन्न हे शासनाचे धोरणावर आवलंबून आहे. अशा प्रकारे एकूण' अपेक्षित उत्पन्न रक्कम रू. १७६ कोटी अपेक्षित आहे.

## इतर जमा

या सदरी स्थानिक संस्था कर कार्यालयाकडून देण्यात येणारे ना- हरकत प्रमाणपत्राची फी रक्कमेचा समावेश असल्याने गतवर्षाचे मासिक सरासरी जमा रक्कम विचारात घेऊन या सदरी र.रू. ५ लाख इतकी तरतूद सुचविणेत आलेली आहे.

## नगरअभियंता

शहरामध्ये अनाधिकृत बांधकामाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिकेच्या भौगोलिक माहितीा यंत्रणा (GIS) द्वारे दिसून येते. जवळपास एक लाख बांधकामे अनाधिकृत आहेत. ही सर्व बांधकामे नियमित करणे,त्यासाठी शासनाची अद्यावत नियमावली येणे जरूरीचे आहे. त्या नियमावलीचा उपयोग करून यातील जी बांधकामे कायदेशीर होतील ती कायदेशीर करणे व गेल्या १० वर्षाचा महसूल बांधकाम विकास शुल्क बांधकाम धारकांकडून वसूल करावा यासाठी दंडात्मक कारवाई करून कायदेशीर करणे क्रमप्राप्त आहे. तदनंतरच महापलिकेच्या उत्पन्न वाढी मध्ये भर होणार आहे.



## कर आकारणी व कर संकलन :

मागील ३ वर्षाचा उत्पन्नाचा व नैसर्गिक बाबीचा विचार करुन थकबाकीचा ७०% व जमाबंदीचा ८०% उत्पन्न धरुन पुढील वर्षासाठी कर आकारणी व कर संकलन खात्याकडून रक्कम रु.१३६.०६ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

शहरामध्ये असलेल्या मिळकतीचे आकारणीचे बिले, ग.व.सु. विभागाकडून तसेच कर आकारणी खात्याकडून या दोन्ही विभागाकडून एकाच मिळकतीचे दोन वेळा आकारणी होत असल्याने अशा न प्राप्त होणाऱ्या रक्कमा डिमांडमध्ये दर्शविल्या जात आहेत.

खुल्या जागेवर किंवा जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन इमारती झाल्या आहेत. अश्या बाबतीत जुन्या इमारतीवरील आकारण्या कमी न होता त्या मिळकतीवरच नवीन बांधकामाच्या आकारण्या होऊन या दोन्ही आकारण्या डिमांडमध्ये आहेत.

भाडेकरी अगर बिल्डरनी घेतलेले नळ, भाडेकरी अगर बिल्डर हे नळ बंद करुन न घेता ते जागा सोडून जातात. त्यामुळे अशा रक्कमा डिमांडमध्ये तशाच वर्षानुवर्षे पुढे ओढल्याने वर्षानुवर्षे डिमांड वाढत चाललेले आहे.

तसेच भौगोलिक माहिती यंत्रणा (GIS) सिस्टीम द्वारे सर्व मालमत्ता

धारकांची सर्व्हे बाबतीत निविदा काढणेची कार्यवाही चालु आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाले नंतर ज्या मालमता धारकांना आकारणी करणेत आलेली नाही किंवा ज्यांनी अतिरिक्त बांधकाम केलेला आहे. अशा सर्व मालमत्ता धारकांकडून दंडासह वसूल करणेची कार्यवाही हाती आहे.

तसेच जनरल रिव्हीजन गेल्या १० ते १२ वर्षापासून झालेले नसल्याने, मा. म.न. पा. सभेकडून कराचे दर निश्चित होऊन मिळाल्यास रिव्हीजन द्वारे उत्पन्नात वाढ होणार आहे.

## भूमी व मालमत्ता कार्यालय :

सोलापूर शहरातील महानगरपालिकेच्या मालकीची निरनिराळे भूखंड, इमारती व जागा निरनिराळ्या व्यक्ती व संस्थांना भुईभाड्याने अथवा भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) नुसार चालू बाजार भावाने भाड्याने अथवा विक्री करणे कायद्याने बंधनकारक असल्याने या पूर्वी



अश्या ज्या जागा अथवा इमारती नाममात्र दराने भाड्याने दिलेले आहेत. अश्या जागांचे पुर्ननिरीक्षण करुन सध्याचे होणारे बाजार भावाने त्यांचेकडून भाडे वसूल करण्याची कार्यवाही करणेकामी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आलेले आहे.त्यास अद्याप मंजूरी मिळालेली नाही. . त्यास मंजूरी मिळल्यास भूमी व मालमत्ता विभागाकडून जास्तीचे उत्पन्न अपेक्षित आहे.

## महसुली खर्च

सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक तयार करताना दुरुस्ती देखभालीच्या खर्चा बरोबरच सेवकांच्या वेतनावर सध्या दाखविणेत आलेल्या खर्चा व्यतिरिक्त सेवकांच्या देय रक्कमाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. म.न.पा. सेवक, सेवानिवृत्त सेवकांचे पेन्शन, प्राथमिक व दुय्यम शिक्षण सेवकांचे खर्च व पाणीपुरवठा सेवकवर्ग खर्च याचा विचार करता एकूण अपेक्षित उत्पन्नाच्या ३९.९७% इतका आस्थापना खर्च होणार आहे.

**मा. महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार महिला व बालकल्याण समितीसाठी व आंबेडकर आवास योजना (श्रमसाफल्य) एकूण महसूलीमधील शिल्लक रकमेतून ५% इतकी रक्कम तसेच अपंगासाठी ३ टक्के इतकी रक्कम तरतूद सुचविणेत आलेली आहे.**

<u>सन २०१७-२०१८ च्या आर्थिक वर्षामध्ये विविध बाबीपासून</u>
<u>मिळणारे उत्पन्न  व त्याची टक्केवारी पुढीलप्रमाणे</u>

## महसूली जमा

| अ.क्र. | विवरण | २०१६-१७ | |
|---|---|---|---|
| | | अंदाज र. रू. | शेकडा प्रमाणे |
| १ | आयातकर/स्थानिक संस्था कर | ५०,००,००,००० | ८.८७ |
| २ | पाणी पुरवठा | ६९,६५,४९,००० | १२.३५ |
| ३ | म.न.पा. कर | ११७,१५,००,००० | २०.७७ |
| ४ | म.न.पा. जागा भाडे | ३२,४०,८५,००० | ५.७५ |
| ५ | शासकीय अनुदान | १८७,५०,६८,००० | ३३.२४ |
| ६ | इतर जमा | ६९,८२,४३,००० | १२.३८ |
| ७ | म.न.पा. दरापासून उत्पन्न | २०,८५,५०,००० | ३.७० |
| ८ | विकास शुल्क | १५,००,००,००० | २.६६ |
| ९ | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोई करणे | १,६०,००,००० | ०.२८ |
| | एकूण | ५६३,९९,९५,००० | १००.०० |

## महसूली खर्च

| अ.क्र. | विवरण | अंदाज र. रू. | शेकडा प्रमाणे |
|---|---|---|---|
| १ | कायम सेवक वर्ग खर्च (पाणी पुरवठा व्यतिरिक्त ) | १७४,१०,२२,००० | ३०.८७ |
| २ | कर्जावरील खर्च | ३,३२,३६,००० | ०.५९ |
| ३ | प्राथमिक व दुय्यम शिक्षणावरील खर्च | १९,२३,६५,००० | ३.४१ |
| ४ | पाणी पुरवठा | ६९,६५,४९,००० | १२.३५ |
| ५ | सेवानिवृत्ती वेतन व तोषदान | ५१,२६,००,००० | ९.१० |
| ६ | आरोग्य | १८,७२,३९,००० | ३.३२ |
| ७ | निगा व दुरूस्ती | २०,२८,७५,००० | ३.६० |
| ८ | दिवाबत्ती व अग्निशामक | १३,५०,००,००० | २.३९ |
| ९ | विकास शुल्क | १५,००,००,००० | २.६६ |
| १० | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोयी करणे | १,६०,००,००० | ०.२८ |
| ११ | आवश्यक बाबीवरील नैमित्तीक खर्च | ५१,२२,६५,००० | ९.०८ |
| १२ | संकीर्ण | १,४३,४८,००० | ०.२५ |
| १३ | महसूल निधीतून भांडवली | ११०,१५,४७,००० | १९.५३ |
| १४ | पाणीपुरवठा तुटीपोटी वर्ग | ७,४९,४९,००० | १.३३ |
| १५ | परिवहन आर्थिक सहाय्य | ७,००,००,००० | १.२४ |
| | एकूण | ५६३,९९,९५,००० | १००.००० |



## महसूली उत्पन्न

| अ.क्र. | विवरण | अंदाज र. रू. | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आयातकर/स्थानिक संस्था कर | ५०,००,००,००० | ८.८७ |
| २ | पाणी पुरवठा | ६९,६५,४९,००० | १२.३५ |
| ३ | म.न.पा. कर | ११७,१५,००,००० | २०.७७ |
| ४ | मनपा जागा भाडे | ३२,४०,८५,००० | ५.७५ |
| ५ | शासकीय अनुदान | १८७,५०,६८,००० | ३३.२४ |
| ६ | इतर जमा | ६९,८२,४३,००० | १२.३८ |
| ७ | म.न.पा. दरापासून उत्पन्न | २०,८५,५०,००० | ३.७० |
| ८ | विकास शुल्क | १५,००,००,००० | २.६६ |
| ९ | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोई करणे | १,६०,००,००० | ०.२८ |
| | एकूण | ५६३,९९,९५,००० | १००.०० |




## महसूली खर्च




| अ.क्र. | विवरण | अंदाज र. रू. | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कायम सेवक वर्ग खर्च (पाणी पुरवठा व्यतिरिक्त ) | १७४,१०,२२,००० | ३०.८७ |
| २ | कर्जावरील खर्च | ३,३२,३६,००० | ०.५९ |
| ३ | प्राथमिक व दुय्यम शिक्षणावरील खर्च | १९,२३,६५,००० | ३.४१ |
| ४ | पाणी पुरवठा | ६९,६५,४९,००० | १२.३५ |
| ५ | सेवानिवृत्ती वेतन व तोषदान | ५१,२६,००,००० | ९.१० |
| ६ | आरोग्य | १८,७२,३९,००० | ३.३२ |
| ७ | निगा व दुरूस्ती | २०,२८,७५,००० | ३.६० |
| ८ | दिवाबत्ती व अग्निशामक | १३,५०,००,००० | २.३९ |
| ९ | विकास शुल्क | १५,००,००,००० | २.६६ |
| १० | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोयी करणे | १,६०,००,००० | ०.२८ |
| ११ | आवश्यक बाबीवरील नैमित्तिक खर्च | ५१,२२,६५,००० | ९.०८ |
| १२ | संकीर्ण | १,४३,४८,००० | ०.२५ |
| १३ | महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग | ११०,१५,४७,००० | १९.५३ |
| १४ | पाणीपुरवठा तुटीपोटी वर्ग | ७,४९,४९,००० | १.३३ |
| १५ | परिवहन आर्थिक सहाय्य | ७,००,००,००० | १.२४ |
| | एकूण | ५६३,९९,९५,००० | १००.००० |

## भांडवली विभाग जमाबाजू

भांडवली विभागाकडील अंदाज पत्रकीय जमा खालीलप्रमाणे अपेक्षित आहे.

### 'अ' महसूल निधीतून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | महसूली निधीतून भांडवली कामासाठी | ११०,१५,४७,००० |
| २ | विकास शुल्क महसूल निधीतून वर्ग | १५,००,००,००० |
| ३ | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोई करणे | १,६०,००,००० |
| ४ | अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सामुहिक सांडपाणी | २,००,००,००० |
| | प्रक्रिया केंद्र | १२८,७५,४७,००० |
| | एकूण | |

### 'ब' अनुदानातून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | प्रधानमंत्री आवास योजना शासकीय सहाय्य | २०,००,००,००० |
| २ | अमृत योजना शासकीय सहाय्य | ४०,००,००,००० |
| ३ | नवीन रस्ते व दुरूस्तीसाठी शासकीय अनुदान | २,००,००,००० |
| ४ | जे.एन.एन.आर.यु.एम. (बसेस खरेदी) अनुदान | २०,००,००,००० |
| ५ | चॅलेंज फंड | १,००,००,००० |
| ६ | पाणीपट्टीवरील उपकर | ५०,००,००० |
| ७ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | १५,००,००,००० |
| ८ | नागरी दलितत्तेर योनजेअंतर्गत वस्त्यांमध्ये सुधारणा | २०,००,००० |
| ९ | जिल्हा नियोजन समिती स्थानिक विकास निधी<br>अ) खासदार निधी – ५०,००,०००<br>ब) आमदार निधी – १,५०,००,००० | २,००,००,००० |
| १० | चौदावे वित्त आयोग अनुदान | ६०,००,००,००० |
| ११ | उजनी ते सोलापूर दुहेरी पाईपलाईन अर्थसहाय्य | ३०,००,००,००० |
| १२ | महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान (रस्ते, गटारे, पाणीपुरवठा भूसंपादन) जिल्हास्तर-जिल्हा नियोजन समिती हिस्सा | १०,००,००,००० |
| १३ | महात्मा गांधी प्राणी संग्राहलय अनुदान | ३,००,००,००० |
| १४ | अल्पसंख्याक विकास अनुदान | ५०,००,००० |
| १५ | महाराष्ट्र शासन सुवर्ण जयंती नागरी पुर्नःउत्थान योजना अनुदान रस्ते व मलनित्सारण व्यवस्था (राज्यशासन) | ३०,००,००,००० |
| १६ | विकास योजना राबविणसाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान –सहा.संचालक नगररचना यांचेकडून अनुदान | २,००,००,००० |
| १७ | अग्निशमन सेवा बळकीटकरण करणे | १,००,००,००० |
| | एकूण | १३७,२०,००,००० |

## 'ड'

| | | |
|---|---|---|
| | म.न.पा.क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधांसाठी विशेष अनुदान | १५,००,००,००० |

## 'इ'

| अ. क्र. | शासकीय सहाय्य | र. रूपये |
|---|---|---|
| १ | दलित वस्त्यांच्या विकास कामासाठी राज्य शासनाकडून अनुदान | १५,००,००,००० |

| | | |
|---|---|---|
| | **अ ते इ ची बेरीज** | ३९५,९५,४७,००० |



## भांडवली विभाग खर्चबाजू
## 'अ' महसुल निधीतून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | रस्ते बांधणे | ३,००,००,००० |
| २ | नवीव दिवे उभारणे | १,००,००,००० |
| ३ | स्मशानभूमी/दफनभूमी सुधारणा | १,००,००,००० |
| ४ | शहरातील बागांचे सुशोभिकरण करणे, सुधारणा करणे व नविन बागा करणे | १,००,००,००० |
| ५ | शहरातील पुतळे परिसर सुधारणा करणे व नवीन पुतळे बसविणे | १,००,००,००० |
| ६ | वॉर्डवाईज कामे | ६,४२,००,००० |
| ७ | मनपा दवाखाने सुधारणा करणे | ५०,००,००० |
| ८ | शहरात विविध ठिकाणी महिलांसाठी सुलभ शौचालय बांधणे | १,००,००,००० |
| ९ | नविन कुपनलिका करणे | १,००,००,००० |
| १० | सोलापूर सायन्स सेंटर अनुदान | २८,००,००० |
| ११ | घंटागाडी, कंटेनर ,हातगाड्या व ड्रम खरेदी | १,००,००,००० |
| १२ | विविध योजनेसाठी मनपा हिस्सा | २०,००,००,००० |
| १३ | ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे | ३,००,००,००० |
| १४ | पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईपलाईन घालणे | २,९५,४७,००० |
| १५ | नाला ट्रेनिंग करणे,नाला उंची वाढविणे | २,००,००,००० |
| १६ | नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजना | ५०,००,००० |
| १७ | जागा संपादन करणे जागा ताब्यात घेणे | ३,००,००,००० |
| १८ | गुंटेवारी क्षेत्रात मुलकुत सोयी करणे | १,६०,००,००० |
| १९ | विविध योजनेसाठी (DPR) तयार करणे | १,००,००,००० |
| २० | अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया व संबंधीत पंपींग स्टोन चालविणे | २,००,००,००० |
| २१ | अमृत योजना अनुदान | १०,००,००,००० |
| २२ | पंतप्रधान आवास योजना मनपा हिस्सा | १५,००,००,००० |
| २३ | शहरातील जलशुध्दीकरण केंद्रास सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे | ५०,००,००० |
| २४ | स्मार्ट सिटा महानगरपालिका हिस्सा | ५०,००,००,००० |
| | **एकूण** | १२८,७५,४७,००० |

## 'ब' अनुदानातून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | प्रधानमंत्री आवास योजना शासकीय सहाय्य | २०,००,००,००० |
| २ | अमृत योजना शासकीय सहाय्य | ४०,००,००,००० |
| ३ | नवीन रस्ते व दुरूस्तीसाठी शासकीय अनुदान | २,००,००,००० |
| ४ | जे.एन.एन.आर.यु.एम. (बसेस खरेदी) अनुदान | २०,००,००,००० |
| ५ | चॅलेंज फंड | १,००,००,००० |
| ६ | पाणीपट्टीवरील उपकर | ५०,००,००० |
| ७ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | १५,००,००,००० |
| ८ | नागरी दलितेत्तर योनजेअंतर्गत वस्त्यांमध्ये सुधारणा | २०,००,००० |
| ९ | जिल्हा नियोजन समिती स्थानिक विकास निधी<br>अ) खासदार निधी – ५०,००,०००<br>ब) आमदार निधी – १,५०,००,००० | २,००,००,००० |
| १० | चौदावे वित्त आयोग अनुदान | ६०,००,००,००० |
| ११ | उजनी ते सोलापूर दुहेरी पाईपलाईन अर्थसहाय्य | ३०,००,००,००० |
| १२ | महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान (रस्ते, गटारे, पाणीपुरवठा भूसंपादन) जिल्हास्तर–जिल्हा नियोजन समिती हिस्सा | १०,००,००,००० |
| १३ | महात्मा गांधी प्राणी संग्राहलय अनुदान | ३,००,००,००० |
| १४ | अल्पसंख्याक विकास अनुदान | ५०,००,००० |
| १५ | महाराष्ट्र शासन सुवर्ण जयंती नागरी पुर्नःउत्थान योजना अनुदान रस्ते व मलनित्सारण व्यवस्था (राज्यशासन) | ३०,००,००,००० |
| १६ | विकास योजना राबविणसाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान –सहा.संचालक नगररचना यांचेकडून अनुदान | २,००,००,००० |
| १७ | अग्निशमन सेवा बळकीटकरण करणे | १,००,००,००० |
| | एकूण | १३७,२०,००,००० |

## 'ड'

| | | |
|---|---|---|
| | म.न.पा.क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधांसाठी विशेष अनुदान | १५,००,००,००० |

## 'इ'

| अ. क्र. | शासकीय सहाय्य | र. रूपये |
|---|---|---|
| १ | दलित वस्त्यांच्या विकास कामासाठी राज्य शासनाकडून अनुदान | १५,००,००,००० |

| | | |
|---|---|---|
| | अ ते इ ची बेरीज | ३९५,९५,४७,००० |



## भांडवली निधी व अनुदानातून करावयाची कामे

१) चालू आर्थिक वर्षामध्ये महसूली निधीतून भांडवली कामासाठी र.रू.११०,१५,४७,०००/– इतकी रक्कम उपलब्ध झालेली आहे.

२) नवीन रस्ते दुरूस्तीकरीता शासकीय अनुदान लोकसंख्येच्या प्रमाणात रू. २ कोटी अनुदान मिळेल असे अपेक्षित धरले आहे.

३) जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या खासदार / आमदार निधितून अनुक्रमे र.रू. ५० लाख व र. रू. १.५० कोटी अशी एकूण र. रू. २.०० कोटी मिळणार असून त्या निधितून जिल्हा नियोजन व विकास मंडळाने सुचविलेली कामे हाती घेण्यात येतील.

## दलित वस्त्यांच्या विकासासाठी शासकीय अनुदान

या आर्थिक वर्षामध्ये दलित वस्ती विशेष घटक योजनेखाली दलित वस्त्यामध्ये विकासाची कामे करण्यासाठी र. रू. १५ कोटीचे आर्थिक सहाय्य मिळेल असे अपेक्षित धरण्यात आले आहे.

## पाणी पुरवठा अंदाजपत्रक ''क''

सोलापूर शहरास खाली प्रमाणे उद्‌भवातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) भिमा नदी | – | ५५ एम.एल.डी. |
| २) उजनी जलाशय | – | ५५ एम.एल.डी. |
| ३) एकरुख तलाव | – | १० एम.एल.डी. |
| एकूण | – | १२० एम.एल.डी. |